राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण

परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# नवोपक्रम स्पर्धा सन २०२१ – २२

(माध्यमिक शिक्षक गट)

नवोपक्रमाचे नाव

## “कोरोना आपत्ती ठरली इष्टापत्ती

## कमवा व शिका हीच विद्यार्थ्यांची संपत्ती ”

स्पर्धकाचे नांव

सौ. नम्रता निलेश पाटील

M. A. B. Ed. DSM.

८७८८९०७६०७

E-mail - rutarudra@gmail.com

टाकळी बोलवाड हायस्कूल टाकळी

[U-DISE CODE - २७३५०५०५००२]

# स्पर्धकाची माहिती

| | | |
|---|---|---|
| स्पर्धकाचे नांव (मराठी) | :- | सौ. नम्रता निलेश पाटील |
| स्पर्धकाचे नांव (इंग्रजी) | :- | Mrs. Namrata Nilesh Patil |
| मोबाईल नंबर | :- | ८७८८९०७६०७, ७५८८३६२८७८ |
| ई-मेल आयडी | :- | rutarudra@gmail.com |
| हुद्दा | :- | सहा. शिक्षिका (Asst. Teacher) |
| युडायस नंबर | :- | २७३५०५०५००२ |
| शाळेचे नांव | :- | टाकळी बोलवाड हायस्कूल, टाकळी |
| शैक्षणिक अर्हता | :- | एम. ए., बी. एड., डीएसएम. |
| नवोपक्रम शिर्षक | :- | **कोरोना आपत्ती ठरली इष्टापत्ती** |
| | | **कमवा व शिका हीच विद्यार्थ्यांची संपत्ती** |
| मार्गदर्शक | :- | डॉ. राजेंद्र भोई |

वरीष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,

DIET, सांगली.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| १. | स्पर्धकाचे प्रतिज्ञापत्र | ४ |
| २. | प्रमाणपत्र | ४ |
| ३. | प्रस्तावना | ५ |
| ४. | नवोपक्रमाची गरज व महत्त्व | ६ |
| ५. | नवोपक्रमाची उद्दिष्टे | ९ |
| ६. | नवोपक्रमाचे नियोजन | १० |
| ७. | नवोपक्रमाची कार्यपद्धती | १६ |
| ८. | नवोपक्रमाची यशस्विता / फल निष्पत्ती | २९ |
| ९. | समारोप | ३१ |
| १०. | संदर्भसूची | ३२ |
| ११. | परिशिष्टे | ३३ |

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीम/डॉ. नम्रता निलेश पाटील प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला कोरोना आपत्ती ठरली इष्टापत्ती, क्षमता व शिक्षण शैली विद्यार्थ्यांची संपत्ती हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : २२/११/२०२१
स्थळ : टाकळी

स्पर्धकाची स्वाक्षरी
नाव : सौ. नम्रता निलेश पाटील
शाळेचा /कार्यालयाचा शिक्का.
टाकळी - बोलवाड हायस्कूल
टाकळी, ता. मिरज, जि. सांगली.

---

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीम/डॉ. नम्रता निलेश पाटील हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला कोरोना आपत्ती ठरली इष्टापत्ती, क्षमता व शिक्षण शैली विद्यार्थ्यांची संपत्ती हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष -------- मध्ये त्यांनी स्वतः राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : २२/११/२०२१
स्थळ : टाकळी

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी
नाव : सौ. पाचोरे प्रभावती प्रभूराज
शिक्का: मुख्याध्यापक
टाकळी बोलवाड हायस्कूल
टाकळी, ता. मिरज, जि. सांगली

Scanned by Scanner Go

# प्रस्तावना

मानवी जीवनाच्या सर्वच बाजुंवर प्रभाव टाकणाऱ्या कोरोनाने शिक्षणक्षेत्रात खूप मोठा व्यत्यय आणला. मार्च २०२० पासुन विद्यार्थी शाळेपासून दुर झाले Online शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडे स्मार्टफ़ोनची वानवा होती. पालकांचा रोजगार गेला होता. शिक्षणापेक्षा रोजगार शोधून दोन वेळच्या जेवणाचा प्रश्न मिटवणं विद्यार्थ्यांना महत्वाचं वाटू लागलं होतं. Online शिक्षण होत नसल्यानं नोव्हेंबर २०२० पासून विद्यार्थ्यांना सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळून शाळेत बोलवण्यास सुरुवात केली. परंतु शिक्षणापेक्षा विद्यार्थ्यांना अर्थार्जन महत्वाचं होतं आणि शाळेत येण्यापेक्षा कामधंदा काही मिळेल का याचा ते प्रयत्न करत होते. अर्थार्जनाची समस्या जाणवल्याने पुस्तकी शिक्षणाबरोबरच त्यांच्यातील कौशल्ये विकसित करून त्यांचा अथार्जनासाठी वापर करता येईल का असा मनात विचार आला, आणि स्वविकास व कलारसास्वाद विषयांतर्गत काही उपक्रम घेण्याचे निश्चित केले.

विद्यार्थांनी एकमेकांच्या कला आत्मसात करुन त्यातून स्वत:चे कौशल्य विकसित करता येईल असा विचार आला. जर प्रत्येकाने आपल्याला येत असलेली कला इतरांना शिकवली तर इतर विद्यार्थीही या कलेत पारंगत होतील आणि या विकसित झालेल्या कौशल्यांच्या आधारे ते काही प्रमाणात अर्थार्जन करुन कुटुंबाला हातभार लावू शकतील असे मला वाटले. कर्मवीरांची 'कमवा व शिका' संकल्पना शालेय जीवनात अंगिकारता येईल आणि शिक्षणात खंड न पडता शिक्षण अविरत चालू राहील असे मला वाटले. त्यातून स्वअभिव्यक्तीला चालना मिळेल."**मी ही या संकट काळात कमवून शिकू शकते**" हा **आत्मविश्वास** वाढेल व त्यांचे व्यक्तिमत्त सदृढ बनेल.

विद्यार्थ्यांमधील **सृजनशीलतेचा** विकास करणे, **'कमवा व शिका'** आयुष्यात उतरविणे या व्यापक उद्देशाने हा उपक्रम हाती घेतला.

# नवोपक्रमाची गरज व महत्त्व

**<u>नवोपक्रमाची गरज</u> :-**

कोरोना महामारीमुळे शाळा बंद झाल्या. आई वडिलांचा रोजगार गेला. शाळा, अभ्यास या पेक्षा अर्थार्जन महत्वाचे ही भावना जोर धरू लागली. विद्यार्थी शाळेत न येता काही कामधंदा मिळेल का याचा शोध घेऊ लागले. विद्यार्थी शिक्षण यांचा संपर्क कमी झाला तर खुप मोठे शैक्षणिक नुकसान व पर्यायाने समाजाचे नुकसान होईल या विचाराने मन अस्वस्थ झाले. या शाळा बंद काळात विद्यार्थ्यांचा शिक्षणाशी संपर्क ठेऊन अर्थार्जनाचे ही काही मार्ग शोधायला हवेत ही तळमळ, धडपड मला गप्प बसु देत नव्हती. where there is will there's a way या इंग्रजी म्हणीनुसार इ.९ वी ला असणाऱ्या स्वविकास व कलारसास्वाद या विषयांतर्गत येणारे उपक्रम केल्यास समृध्द, सुसंस्कारित नागरीक घडू शकतील. शालेय जीवनातुन बाहेरच्या विश्वात पाऊल ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांना,बाहेरील जगात आत्मविश्वासाने जगण्यासाठी सुसज्ज करण्याच्या हेतुने एक सेतू उभारता येईल असे वाटले आणि या नवोपक्रमाची कल्पना सुचली.

लॉकडाऊनच्या काळात “**कोरोना आपत्ती ठरली इष्टापत्ती कमवा व शिका हीच विद्यार्थ्यांची संपत्ती** ” हा नवोपक्रम हाती होतलात्याची उपयुक्तता लक्षात . घेऊन इ .९ वीच्या विद्यार्थांसाठी हा उपक्रम राबविण्याचे ठरवले.

विविध कला आत्मसात करुन स्वत:ची वैयक्तिक व आर्थिक बलस्थाने निश्चित करणे व आपल्या मित्र-मैत्रिणींमधील विविध कला आत्मसात करून सृजनशीलता विकसित करण्याबरोबर शिक्षणाशी संपर्क नित्य रहावा हा व्यापक दृष्टीकोन ठेवून या उपक्रमाची सुरुवात केली.

**"शाळा बंद शिक्षण चालू "** या शासनाच्या उपक्रमानुसार, ‘**शिक्षण अविरत चालू**’ या धोरणास या उपक्रमाने मूर्त स्वरूप आले.

**<u>नवोपक्रमाचे महत्व</u> :-**

कोरोना संकटकाळात विद्यार्थांच्या मनावर खूप मोठे दडपण होते. शालेय शिक्षणाबरोबरच आपल्या एखाद्या कौशल्याच्या सहाय्याने आपण आपल्या कुटुंबाला हातभार लावू शकतो तसेच 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ ' या उक्तीनुसार **स्वविकास** घडवू शकतो आत्मविश्वास बळावण्याच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त, महत्वाचा वाटला.

ग्रामस्थांच्या गरजा गावातच पूर्ण होत असतील तर **गाव स्वावलंबी** बनेल, या दृष्टीनेही हा उपक्रम महत्त्वाचा ठरतो. विद्यार्थांच्या समस्येवर उपाय सापडल्याने त्यांची ज्ञानार्जनाची प्रक्रिया सुलभ होईल या दृष्टीने हा उपक्रम महत्वाचा ठरतो.

**<u>नवोपक्रमाचे वेगळेपण</u> :-**

१) कोरोनामुळे शिक्षणात जो अडथळा आला होता, या आपत्तीचे एका इष्टापतीत रुपांतर करण्याची किमया या उपक्रमाने केली.
२) जीवनातील आव्हानांना सक्षमपणे सामोरे जाण्याची तसेच आपत्तीजनक परिस्थितीत संधी ओळखण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली.
३) कलेमुळे आयुष्य समृद्ध होऊ शकते, संघर्ष (शाळा की अर्थार्जन) मिटवण्यासाठी नाविन्यपूर्ण मार्गांचा शोध घेण्याची क्षमता विकसित झाली.
४) एखादा छोटासा बदल घडविण्यासाठी आवश्यक असलेला नेतृत्व गुण विकसित होण्यास मदत झाली.
५) शिक्षण थांबवून अर्थार्जन महत्वाचे हा धोक्याचा पर्याय टाळण्यासाठी, शिक्षण पुन्हा अविरत चालू ठेवण्यासाठी उपक्रम महत्वाचा ठरला.
६) अवतीभवती असलेल्या सामाजिक समस्या आणि त्या अनुषंगाने स्वतःची समाजाप्रती असणारी जबाबदारी याबाबतची जाणिव झाली. इतर विद्यार्थ्यांबाबत ची संवेदना प्रतिपादित करण्यास मदत झाली.

**<u>नवोपक्रमाची उपयुक्तता</u> :-**

थांबलेले शिक्षण अविरतपणे चालु राहण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरला.
१) जागतिकिकरणाच्या २१ व्या शतकात आवश्यक असलेली **जीवनकौशल्ये आत्मसात** करण्यासाठी व यशस्वी शैक्षणिक वाटचालीसाठी हा उपक्रम यशस्वी ठरतो.
२) स्वत:ची बलस्थाने शोधण्यास व सुधारण्यास मदत झाली..
३) एखाद्या प्रयोगजीवी कलेमध्ये स्वतःच्या सृजनशीलतेच्या आधारे **नवनिर्मिती** करता येण्याची क्षमता निर्माण होण्यास मदत झाली.
४) दैनंदिन आयुष्यातील समस्यांवर मात करण्यासाठी मदत झाली. घटना व परिस्थितीचे विश्लेषण करून योग्य पर्याय निवडून घेण्याची क्षमता प्रतिपादित झाली.
५) **नेतृत्वगुण** विकसित होण्यास मदत झाली.
६) संघर्षजन्य परिस्थितीचे वस्तुनिष्ठपणे विश्लेषण करून त्या परिस्थितीवर मात करण्याची क्षमता निर्माण झाली.
७) जीवनाकडे बघण्याची एक नवी दृष्टी विकसीत होण्यास मदत झाली.
८) व्यावहारिकदृष्ट्या **आत्मनिर्भर** होण्याची संधी मिळाली.
९) शाळा बंद असतानाही शिक्षणाशी संपर्क टिकवून ठेवण्यासाठी हा उपक्रम महत्वाचा ठरला.

## क्षमतानुसार उद्दिष्टे

**इयत्ता- नववी** **विषय - स्वविकास व कलारसास्वाद**

| अ.क्र. | क्षमता | क्षमता विधान | उद्दिष्टे |
|---|---|---|---|
| १ | सामाजिक भान आणि जबाबदारी | अवतीभोवती असलेल्या सामाजिक समस्या व त्या अनुषंगाने स्वतःची समाजाप्रती असलेली जबाबदारी या बाबतची जाणिव प्रतिपादीत करणे. | सामाजिक समस्यांच्या अनुषंगाने समाजाप्रती असलेली जबाबदारी ओळखण्यास प्रोत्साहित करणे. |
| २ | चिकित्सक विचार | संघर्षजन्य परिस्थिती स्वत:ची आवड, संधी, क्षमता यांचा चिकित्सक विचार करुन ते शब्दांकित उतरवण्याची क्षमता प्रतिपादीत करणे. स्वतः च्या उणिवांचे विश्लेषण करुन त्यावर मात करण्यासाठी विविध मार्ग़ शोधण्याची क्षमता प्रतिपादीत करणे. | स्वतः च्या उणिवांवर मात करत संघर्षजन्य परिस्थितीचे वस्तुनिष्ठपणे विश्लेषण करुन आपली आवड, संधी, क्षमता ओळखून ते कलाकृतीत उतरवण्यास प्रोत्साहित करणे. |
| ३ | सृजनशीलता | प्रयोगाजीवी कलेमध्ये, स्वतःच्या सृजनशीलते च्या आधारे नवनिर्मिती करता येण्याची क्षमता प्रतिपादीत करणे. | स्वतःच्या सृजनशीलते च्या आधारे नवनिर्मिती करण्यास प्रोत्साहित करणे. |
| ४ | नेतृत्वक्षमता /नेतृत्वगुण | समाजात एखादा छोटासा बदल घडवण्यासाठी आवश्यक असलेला नेतृत्वगुण प्रतिपादीत करणे. | नेतृत्वक्षमता विकसित करण्यास मदत करणे. |
| ५ | सांघिक कार्य | समुहांमध्ये सांघिक कार्य करीत असताना सामान आवडीच्या क्षेत्रांबददल अधिक माहिती शोधण्यास गटात सांघिक कार्य करण्याची क्षमता प्रतिपादीत करणे. | सांघिक कार्य करण्यास प्रतिपादीत करणे. |
| ६ | कलाविष्कार निर्मिती | विविध दृष्य कलांपैकी एकाचा वापर करुन कलाविष्कार निर्माण करण्याची क्षमता प्रतिपादीत करणे. | कलाविष्कार निर्माण करण्यास प्रोत्साहित करणे. |
| ७ | स्वयंव्यवस्थापन | स्वतः च्या उणिवांवर मात करुन यशस्वी होण्याच्या दृष्टीने योग्य नियोजन करण्याची क्षमता प्रतिपादीत करणे. | यशस्वी होण्यासाठी योग्य नियोजन करण्यास प्रोत्साहित करणे. |
| ८ | प्रत्यक्ष जीवनातील उपयोजन | कलेचे महत्व सांगता येण्याची क्षमता प्रतिपादीत करणे. | |

# नवोपक्रमाची उद्दिष्टे

१) अध्ययनक्षमतेनुसार, स्वविकास व कलाररास्वाद या विषयातील अध्ययन क्षय शोधणे.

२) सामाजिक समस्यांच्या अनुषंगाने समाजाप्रती असलेल्या स्वतःच्या जबाबदाऱ्या ओळखण्यास प्रोत्साहित करणे.

३) स्वत:च्या उणिवांवर मात करत, संघर्षजन्य परिस्थितीचे वस्तुनिष्ठपणे विश्लेषण करून आपली आवड, क्षमता, संधी ओळखून ते कलाकृतीत उतरवण्यास सृजनशीलतेच्या आधारे नवनिर्मिती करण्यास प्रोत्साहीत करणे.

४) नेतृत्वक्षमता विकसित करुन एकजुटीने सांघिक कार्य करण्यास प्रोत्साहित करणे.

५) यशस्वी बनण्यासाठी योग्य नियोजन करण्यास प्रोत्साहीत करणे.

६) विद्यार्थी आत्मनिर्भर बनण्यास मदत करणे.

## नवोपक्रमाचे नियोजन व कार्यवाही

नवोपक्रमाचे नियोजन कोरोना कालखंडातील माहे डिसेंबर २०२१ ते माहे फ़ेब्रुवारी २०२१ या कालावधीत केले होते. यासाठी आमच्या टाकळी बोलवाड हायस्कूल टाकळी विद्यालयासाठी इ.९ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी “कोरोना आपत्ती ठरली इष्टापत्ती कमवा व शिका हीच विद्यार्थ्यांची संपत्ती ” या नवोपक्रमासाठी निवड करण्यात आली.

**i) उपक्रमपूर्व स्थितीचे निरिक्षण :-**

कोरोनाचा प्रभाव थोडा कमी झाल्यानंतर विद्यार्थ्यांना शाळेत बोलवण्यात येऊ लागले. परंतु काही विद्यार्थी शाळेत येण्यास उदासिन होते. आर्थिक विवंचना होती. इतर सर्वच विद्यार्थ्यांचा वेळेचा सदुपयोग होणे गरजेचे होते. विद्यार्थ्यांचा एकलकोंडेपणा वाढत होता. इतर काही विद्यार्थ्यांचा बराचसा वेळ टी.व्ही किंवा मोबाईल बघण्यात जात होता.

विद्यार्थी निरिक्षण सुचीच्या आधारे उपक्रमपूर्व निरिक्षण केले त्यामध्ये खालील निरिक्षणे आढळून आली.

### ➢ विद्यार्थ्यांचे उपक्रमपूर्व निरिक्षण :

| अ.क्र. | निरिक्षणाचा मुद्दा | उपक्रमपूर्व |
|---|---|---|
| १) | Online तासाला नियमित हजर असतो. | १ ०% |
| २) | सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळतो. | ८०% |
| ३) | स्वत:च्या जबाबदाऱ्या ओळखतो. | ३०% |
| ४) | अवतिभोवतीच्या गोष्टींचे बारकाईने निरिक्षण करतो. | ३५% |
| ५) | इतरांची टिंगल उडवतो. | ८०% |
| ६) | गटाने मिळुन कार्य करण्यास इच्छुक असतो. | ४०% |
| ७) | बराचसा रिकामा वेळ टी.व्ही पाहण्यात घालवतो. | ९०% |
| ८) | कुटुंबाचा आर्थिक भार उचलण्यास मदत करतो. | ५०% |

| | | |
|---|---|---|
| ९) | सृजनात्मक कार्‍यात भाग घेतो. | ५०% |
| १०) | दैनंदिन समस्येवर मात करण्याचा प्रयत्न करतो. | ४०% |
| ११) | नवनवीन गोष्टी शिकण्याची आस धरतो. | २०% |
| १२) | नेतृत्व करण्यास तयार असतो. | २०% |
| १३) | यशस्वी बनण्याबाबत उदासिन असतो. | ६०% |
| १४) | आपल्या कलेचे उपयोजन करतो. | ३०% |
| १५) | नियमित अभ्यास करतो. | २०% |

❖ **पालक प्रश्नावली मधून खालील माहिती मिळाली.**

१) बर्‍याच पालकांकडे स्मार्टफ़ोन उपलब्ध नसल्याने त्यांचा/ त्यांची पाल्य नियमित online class ला उपस्थित नसत.(१ ०%)

२) त्यांचे पाल्य नियमित वाचन लेखन करण्यास कंटाळा करतात.(९८%)

३) त्यांचे पाल्य अवततिभोवतीच्या समस्यांकडे दुर्लक्ष करत होते.(८६%)

४) बरेचसे पाल्य स्वतःच्या जबाबदार्‍याही नीट पार पाडत नसत.(७६%)

५) नवनविन गोष्टी शिकण्याचा प्रयत्न पुर्णत: थांबला होता.(८०%)

६) गरजवंतांची गरज ओळखण्याचा प्रयत्नच करत नसत.(८८%)

७) रिकाम्या वेळेचा वापर फ़क्त टी.व्ही  पाहण्यासाठी केला जात असे.(८५%)

८) नवीन कलाकृती/कलात्मक गोष्ट तयार करावी असे पाल्यांना वाटत नसे.(८२%)

९) स्वत:ची कला इतरांना शिकवावी असा विचारही मनात येत नसे.(८२%)

१०) काही विद्यार्थी घरचा आर्थिक भार उचलण्याचा प्रयत्न करत, परंतु त्यामुळे शालेय प्रवाहातून बाहेर पडण्याचा धोका संभवत होता.(५०%)

तेव्हा वरील समस्या सोडवण्यासाठी काही उपक्रमांची निवड करत त्यांचे सुक्ष्म नियोजन करण्यात आले.

**ii) <u>संबंधित व्यक्तींशी / तज्ञांशी चर्चा</u> :-**

या समस्येबाबत सर्वप्रथम मी शाळेतील मुख्याध्यापक- सौ. प्रज्ञांजली पाचोरे,सहकारी शिक्षक- श्री. बाळासाहेब सपकाळ, पालक , काही माजी विद्यार्थी यांच्याशी चर्चा केली. तसेच DTET सांगली

येथील अधिव्याख्याते डॉ. सौ. वैशाली भोई मॅडम, श्री. टी. एम कुंभार सर व जेष्ठ अधिव्याख्याते डॉ. राजेंद्र भोई सर यांचेशी संबंधित समस्या आणि उपाय याबाबत चर्चा केली.इ.९ वी च्या विद्यार्थ्यांशी त्यांच्यासमोर असलेल्या समस्यांशी चर्चा केली. विद्यार्थ्यांना व पालकांना पूर्वकल्पना देऊन उपक्रम करण्याचे निश्चित केले.

वरील समस्येवर उपाययोजना करण्यासाठी मल्टीस्किल फाउंडेशन कोर्स या N.G.O. संस्थेच्या निदेशिका सौ. पूजा पवार यांचेशी उपक्रम निर्मितीबाबत चर्चा केली.

**iii) <u>आवश्यक साधनांचा विचार</u> :-**

नोव्हेंबर २०२० पासून काही विद्यार्थी शाळेत offline शिक्षणाकरीता येऊ लागले. विद्यार्थ्यांचे निरिक्षण केले असता वर्तनात बदल झाल्याचे दिसून आले, Learning Loss झाल्याचे आढळले. या समस्येबाबत मी DIET मधील जेष्ठ अधिव्याख्याता डॉ. राजेंद्र भोई सर यांच्याशी चर्चा केली.

अध्ययनक्षय व त्यावर उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न केला.दैनंदिन निरिक्षणातून काही बाबी समोर आल्या. पालक प्रश्नावली तयार करुन समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांना त्यांच्या अवतीभोवती असलेल्या सामाजिक समस्या आणि त्या अनुषंगाने त्यांची या समाजाप्रती असलेली जबाबदारी यांची जाणीव करुन देणं गरजेचं होतं. समाजात अस्तित्वात असणारी परस्परावलंबनाची जाणिव होणं आणि त्या अनुषंगानं इतर लोकांबाबतची सहवेदना यांची जाणिव करुन आवश्यक वाटलं.

दैनंदिन आयुष्यातील घटना व परिस्थितीचे विश्लेषण करुन योग्य पर्याय निवडता येण्याची तसेच समस्येची व्याप्ती व गांभीर्य निर्धारित करुन संघर्षजन्य परिस्थितीत वस्तुनिष्ठपणे विश्लेषण करुन ती समजून घेण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे आवश्यक होतं. स्वत:च्या उणिवांचे विश्लेषण करुन स्वत:ची आवड, क्षमता यांचा विचार विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होण गरजेचं वाटलं.

नाविण्यपूर्ण मार्ग शोधून, प्रात्यक्षिकाच्या (दृष्य कलेच्या) माध्यमातून एखादा कलाविष्कार निर्माण करण्याचा प्रयत्न करायला हवा.

समाजात चांगले बदल घडवण्यासाठी नेतृत्व घडायला हवं. सामाजिक समस्येवर मात करण्यासाठी एकजुटीनं कार्य करणं गरजेचे आहे हे विद्यार्थ्यांवर बिंबवणं महत्वाचं होत. कलेचा वापर करुन समस्येवर तोडगा निघू शकतो याची जाणिव करुन देणं गरजेचं होतं.

आपली बलस्थाने शोधुन प्रगतीच्या संधी शोधण्यासाठी स्वयंव्यवस्थापन करणं, सृजनशीलतेचे महत्व समाजासमोर मांडून प्रत्यक्ष जीवनातील उपायोजन करणं महत्वाचं वाटलं.

सर्व बाबींचा विचार करुन काही कलाकृतींचा क्रम ठरविला. तज्ञ मार्गदर्शक म्हणून माजी विद्यार्थी तसेच वर्गातील काही विद्यार्थी यांची मदत घेण्याचे निश्चित केले. कलाकृती बनविण्यासाठी लागणाऱ्या वस्तू उदा. लोकर, मायक्रॉन, सुई, दोरा, मणी, डिंक, कापड, इलॅस्टिक, कार्डशकिट पेपर, कागद, आरसे, टिकल्या, रांगोळी, शेंगदाणे, गुळ, तीळ, पिशव्या इ. गोष्टींची यादी तयार केली.

**iv) <u>करावयाच्या कृतींचा क्रम</u> :-**

नवोपक्रमांची प्रभावी यशस्वी अंमलबजावणी होणे,वर्ग निवडणे, विद्यार्थ्यांना पूर्वकल्पना देणे, आवश्यक साहित्य आणणे, दिनांक व वेळ निश्चित करणे, मार्गदर्शक निश्चित करणे. वापरावयाची तंत्रे निश्चित करणे, प्रत्यक्ष उपक्रम राबविणे व मुल्यमापनाद्वारे यशस्विता तपासणे हा कृतींचा क्रम निश्चित केला.

| **अ.क्र.** | **उपक्रम** |
|---|---|
| १ | मास्क बनवणे |
| २ | लोकरीचे तोरण बनवणे |
| ३ | मायक्रॉन किचन बनवणे |
| ४ | मायक्रॉनचे तोरण, किल्ली स्टँड,मोबाईल होल्डर,झुंबर बनवणे. |
| ५ | सुशोभित बांगडी बनवणे |
| ६ | तिळाची व शेंगदाण्याची चिक्की बनवणे |
| ७ | Instant Food Packet बनवणे |
| ८ | मास्क, मायक्रॉनच्या वस्तु, चिक्कींची विक्री |
| ९ | रांगोळी (संस्कार भारती) |
| १० | आकाशकंदील |
| ११ | मेहंदी |

**v) <u>उपक्रमोत्तर स्थितीचे निरिक्षण</u> :-**

**"कोरोना आपत्ती ठरली इष्टापत्ती कमवा व शिका हीच विद्यार्थ्यांची संपत्ती"** हा उपक्रम राबविल्यानंतर बहुतांशी विद्यार्थ्यांच्या मनात शाळेची पुन्हा एकदा आवड निर्माण झाली. नवीन कला आत्मसात केल्यानंतर त्यांच्या सृजनशीलतेस चालना मिळाली. अवतीभोवतीच्या सामाजिक समस्या आणि त्या अनुषंगाने त्यांची समाजाप्रती असलेली जबाबदारीची जाणिव व्रुध्दिंगत होण्यास मदत झाली. समाजात बदल घडवण्यासाठी आवश्यक नेतृत्व गुण विकसित होण्यास मदत झाली. समस्या

निराकरण करण्याची क्षमता विकसित झाली. कलेचे दैनंदिन जीवनात उपयोजन होण्यास मदत झाली.शैक्षणिक व आर्थिक  हित साधून संघर्ष सोडवण्याची क्षमता वाढवण्यास मदत झाली व त्यांच्यात सकारात्मक बदल दिसुन आला.

**vi) <u>कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक)</u> :-**

| अ.क्र. | दिनांक | वेळ | उपक्रम |
|---|---|---|---|
| १ | १ डिसेंबर ते ५ डिसेंबर २०२० | १२ ते २ | मास्क बनवणे |
| २ | ७ डिसेंबर ते १२ डिसेंबर २०२० | १२ ते २ | लोकरीचे तोरण बनवणे |
| ३ | १५ डिसेंबर ते १९ डिसेंबर २०२० | १२ ते २ | मायक्रॉन किचन बनवणे |
| ४ | २१ डिसेंबर ते २ जानेवारी २०२० | १२ ते २ | मायक्रॉनचे तोरण, किल्ली स्टँड,मोबाईल होल्डर,झुंबर बनवणे. |
| ५ | ४ जानेवारी ते ९ जानेवारी २०२१ | १२ ते २ | सुशोभित बांगडी बनवणे |
| ६ | ११ जानेवारी ते १६ जानेवारी २०२१ | १२ ते १ | तिळाची व शेंगदाण्याची चिक्की बनवणे |
| ७ | १८ जानेवारी ते २२ जानेवारी २०२१ | १२ ते १ | Instant Food Packet बनवणे |
| ८ | २६ जानेवारी २०२१ | ७ ते ९ | मास्क, मायक्रॉनच्या वस्तु, चिक्कींची विक्री |
| ९ | २७ जानेवारी ते ३० जानेवारी २०२१ | १२ ते २ | रांगोळी (संस्कार भारती) |
| १० | १ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी २०२१ | १२ ते २ | आकाशकंदील |
| ११ | ८ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०२१ | १२ ते २ | मेहंदी |

**vii) <u>उपक्रमासाठी इतरांची मदत</u> :-**

मला या उपक्रमात DIET चे जेष्ठ आधिव्याख्याता डॉ.राजेंद्र भोई, सर डॉ. वैशाली भोई, मॅडम, श्री. टी. एम. कुंभार सर या तज्ञांची मदत झाली. यांच्याशी विचार विनिमय करुनच या उपक्रमाचा आराखडा निश्चित करण्यात आला. माजी विद्यार्थिनी कु. अंजली पाटील हीची ही मदत झाली. तसेच इ.९ वी च्या विद्यार्थीनी कु. श्रावणी पाटील, सायली पाटील, श्रावणी पाटील, सुप्रिया वाघमोडे, साक्षी पाटील, अलमास शेख, सानिया बोजगार,जिनेश्वर पाटील, स्वप्निल पाटील, श्रेया पाटील, नेहा चौगुले यांची मदत झाली. मल्टीस्किल फाउंडेशन कोर्स या N.G.O. संस्थेच्या निदेशिका सौ. पूजा पवार यांची मदत झाली.

**viii) <u>उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे</u> :-**

१)प्रशिक्षण घेतानाचे फ़ोटो.

२)प्रशिक्षण घेत असताना केलेले video.

३)वेळापत्रक.

४)विद्यार्थी निरिक्षणे.

५)पालक प्रश्नावली.

६)साहित्य विक्री नोंदी.

७)पालकांचे अभिप्राय.

८)साहित्य खरेदी केलेल्या ग्रामस्थांचे अभिप्राय.

## नवोपक्रमाची कार्यपद्धती

❖ **<u>मास्क बनवणे</u> :-**

दि: १ डिसेंबर ते ५ डिसेंबर २०२० वेळः १२ ते २

तज्ञ मार्गदर्षकः कु. श्रावणी गुणधर पाटील ( इ.९ वी)

कोरोना कालखंडापासून आजतागायत मास्क परिधान करणे ही काळाची गरज बनली आहे. इ.९ वी च्याच वर्गातील कु. श्रावणी पाटील यांच्या मागदर्शनानुसार इतर विद्यार्थी मास्क बनवायला शिकले. काही विद्यार्थ्यांनी एकपदरी तर काहींनी दोन पदरी मास्क बनविले. मास्क आणण्याकरीता लोकांच्या सुरुवातीच्या काळात जवळ असणाऱ्या मिरज शहरात जावे लागे.पण आमच्या विद्यार्थिनींनी कमी किंमतीत मास्क शिवून त्यांची विक्री केली. गावातील लोकांना कमी किंमतीत दर्जेदार मास्क मिळाले व विद्यार्थ्यांचा आर्थिक फायदा झाल्याने कुटुंबास हातभार लागला. **स्वतःची निरंतर गरजेची गोष्ट स्वतः बनवण्यात विद्यार्थी स्वावलंबी झाले.**





**मास्क निर्मिती करताना विद्यार्थी**

❖ **<u>लोकर व मायक्रॉन वस्तू :-</u>**

दि. ७ डिसेंबर ते २ जानेवारी २०२१ वेळ- १२ ते २

तज्ञ मादिर्शक : कु सुप्रिया वाघमोडे (इ. ९ वी),

कु.सानिया बोजगार(इ. ९ वी),

कु. श्रावणी भाऊसो पाटील (इ. ९ वी).

गृहसजावट ही सर्वांची आवडती आणि आवश्यक गोष्ट सजावटीसाठी काही गोष्टी आपणच बनवल्या तर? असा विचार करून इ.९ वीत शिकणाऱ्या विद्यार्थिनी कु. सुप्रिया वाघमोडे, कु.सानिया बोजगार व कु. श्रावणी पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार लोकर व मायक्रॉनच्या वस्तू उदा. लोकरीचे तोरण, मायक्रॉनचे तोरण मायक्रॉनचे आरसे, मायक्रॉनचे हँगर्स, कीचेन अशा वस्तू इतर विद्यार्थ्यांनी बनविल्या. गावातील लग्नप्रसंगी या वस्तूंची विक्री करुन विद्यार्थिनींनी भरघोस नफ़ाही मिळवला.





**लोकर व मायक्रॉन वस्तू निर्मिती करताना विद्यार्थी**

❖ **<u>सुशोभित बांगडी बनवणे</u> :-**

दि. ४ जानेवारी ते ९ जानेवारी २०२१ वेळ. १२ ते २

तज्ञ मार्गदर्शक: कु.सायली पाटील

बांगडी हा स्त्रीचा अलंकार याच पारंपारीक बांगडीवर रेशमी धाग्याची कलाकुसर झाली तर ती आणखी खुलते इ.९ वी तील विद्यार्थिनी कु.सायली पाटील हिच्या मार्गदर्शनानुसार वर्गातील इतर विद्यार्थीही अशा प्रकारच्या बांगडया तयार करू शकले व विक्री करू शकले.



**सुशोभित बांगडी बनवताना विद्यार्थिनी**

❖ **<u>शेंगदाण्याची चिक्की, तिळाची चिक्की</u>** :-

दि. ११ जानेवारी ते १६ जानेवारी २०२१ वेळ १२ ते २

तज्ञ मार्गदर्षक: सौ पूजा शिंदे (मल्टीस्किल फाऊंडेशन कोर्स)

मल्टीस्किल फाऊंडेशन कोर्स अंतर्गत विद्यार्थी चिक्कीबनवायला शिकले होतेच. त्यांना त्या कलेचा संबंध व्यवसायाशी जोडुन दिला. छोटया छोटया पिशव्या (वजनानुसार) - चिक्कीची पाकिटे बनवली. बाजारभावापेक्षा कमी किंमतीत विक्री केली. विद्यार्थ्यांचा आर्थिक फायदा झाला.



**शेंगदाण्याची चिक्की, तिळाची चिक्की बनवताना विद्यार्थिनी**

❖ **Instant food :-**

दि.१८ जानेवारी ते २२ जानेवारी २०२१  वेळ १२ ते २

तज्ञ मार्गदर्शक: सौ. नम्रता पाटील.

आजकाल लोकांमध्ये Instant food चे फॅड मोठ्या प्रमाणात आहे आम्ही विचार केला की अशा स्वरूवात काही पौष्टीक गोष्टी आपल्याला देता येतील का? यानुसार चर्चा केली आणि विद्यार्थ्यांनी चविष्ट Instant food ची - Tasty maize पौष्टिक उपमा,चटपटीत पोहा,अशी पाकिटे बनवली. सृजनशीलता विकसित झाली.

❖ **२६ जानेवारी २०२१ - मास्क मायक्रॉनच्या वस्तूंचे  प्रदर्शन व विक्री :-**

२६ जानेवारी २०२१ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम संप्पन झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी बनविलेल्या मास्क व मायक्रॉनच्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री करण्यात आली. या कार्यक्रमास ग्रामस्थांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. विक्री चांगली झाल्याने विद्यार्थ्यांचा चांगलाच फायदा झाला.






**वस्तूंची विक्री करताना विद्यार्थी**

❖ <u>रांगोळी निर्मिती व रेखाटन</u> :-

दि. २७ जानेवारी ते ३० जानेवारी वेळ- १२ ते २

तज्ञ मार्गदर्शक : अंजली पाटील (माजी विद्यार्थिनी)

संस्कारभारती रांगोळी शिकणं हे उद्दिष्ट ठेऊन माजी विद्यार्थिनी कु.अंजली संजय पाटील हिच्याशी चर्चा केली. तिच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील विद्यार्थी रांगोळी काढण्यात तरबेज झाले. पांढरी रांगोळी आणून त्यापासून रंगीत रांगोळी तयार करुन त्याची विक्री केली.



**रांगोळी काढताना विद्यार्थिनी**

❖ <u>मेहंदी तयार करणे आणि काढणे</u> :-

दि.८ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०२१ वेळ- १२ ते २

तज्ञ मार्गदर्शक: कु. नेहा चौगुले.

मेहंदी मुलींचा आवडता विषय सण समारंभ आले की मेहंदी आलीच. ९ वी तील विद्यार्थिनींच्या मार्गदर्शनानुसार इतर विद्यार्थीनी मेहंदीत निपून झाल्या. मेहेंदी कोन कसा बनवाचा त्याचे प्रात्यक्षिक तिने इतर विद्यार्थीनींना दिले.





**मेहंदी काढताना विद्यार्थिनी**

❖ **<u>आकाश कंदील निर्मिती</u> :-**

दि.१ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी वेळ- १२ ते २

तज्ञ मार्गदर्शक: जिनेश्वर पाटील.

विद्यार्थ्यांनी एकमेकांच्या मार्गदर्शनानुसार व सहकाऱ्याने आकाश कंदील बनवले.दिवाळीला आकाशकंदीलाचा खर्चही वाचविला.व स्वत:च्या कलात्मकतेचाही आनंद घेतला.





**आकाशकंदील बनवताना विद्यार्थी**

❖ **मास्क मायक्रॉनच्या वस्तूंची विक्री :-**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | उपक्रम | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मास्क बनवणे | मायक्रॉन वस्तू | शेंगदाण्याची चिक्की | रांगोळी | एकूण रुपये |
| १ | कु.योगिता अजित पाटील | ३०० | ९५ | १२० | २१० | ७२५ |
| २ | कु.श्रावणी गुणधर पाटील | १७० | २४० | ९० | १८० | ६८० |
| ३ | कु. सायली महावीर पाटील | १७५ | ३५० | ८० | १९० | ७९५ |
| ४ | कु.श्रेया राजगोंडा पाटील | १६० | २९० | ७० | | ५२० |
| ५ | कु. श्रावणी भाऊसो पाटील | ८० | २०० | ८५ | १७० | ५३५ |
| ६ | कु. अलमास अशपाक शेख | १ २० | ५५० | ६५ | ३१० | १ ०४५ |
| ७ | कु. सानिया राजू बोजगार | १ ८० | ४१० | ७५ | २४० | ९०५ |
| ८ | कु.सुप्रिया शंकर वाघमोडे | ८५ | १७० | ७० | २८० | ६०५ |
| ९ | कु.नेहा संजय चौगुले | - | १०० | ७० | १९५ | ३६५ |
| १० | कु.साक्षी अजित पाटील | - | १७५ | ६० | २८५ | ५२० |
| ११ | कु.पूजा रावसाहेब बिराजदार | - | १३० | १३५ | १८५ | ४५० |
| १२ | कु.इशिता विजय खाडे | - | - | ८० | - | ८० |
| १३ | कु.प्राची सचिन कांबळे | - | १०० | - | - | १०० |
| १४ | कु.सुस्मिता सतिश वाघमारे | - | २२० | ६० | - | २८० |
| **एकूण रुपये** | | **१२७०** | **३०३०** | **१०६०** | **२२४५** | **७६०५** |

**i) <u>उपक्रम पूर्वस्थितीचा निरिक्षणे व नोंदी</u> :-**

शाळा बंद असल्याने बराचसा वेळ टी.व्ही बघण्यात गेला.शाळेबद्दल उदासिनता निर्माण झाली होती.

पण त्यामुळे शालेय अभ्यासात खंड पडत होता. दैनंदिन समस्येवर मात करण्याचा काही विद्यार्थी प्रयत्न करत होते., पण योग्य मार्गदर्शनाची गरज होती. नवनवीन गोष्टी शिकण्याची आस कमी झाली होती. त्यांच्या एखाद्या कलेचे उपयोजन करण्यास मार्गदर्शनाची गरज होती.

विद्यार्थी online तासाला हजर नसत. स्वत:च्या जबाबदाऱ्या ओळखण्यात कमी पडत होते. अवतीभोवतीच्या समस्यांकडे चिकित्सकपणे बघण्याची समज नव्हती.

**ii) <u>कार्यवाही दरम्यान निरिक्षणे व माहिती संकलन</u> :-**

१) विद्यार्थ्यांना त्यांच्या अवतीभोवतीच्या सामाजिक समस्या व त्याप्रती त्यांची जबाबदारी याबाबत सामाजिक भान व जबाबदारी समजू लागली.

२) संघर्षजन्य परिस्थितीचा चिकित्सक विचार करु लागले.

३) सृजनशीलतेस वाव मिळू लागला.

४) समाजात बदल घडविण्यासाठी मी नेतृत्व करू शकतो ही भावना विकसित होऊ लागली.

५) सांघिक कार्याची गरज वाटू लागली.

६) कलाविष्कार घडवून कुटुंबाला आर्थिक मदत करु शकतो हा आत्मविश्वास वाढला.

७) अनाठायी वेळ टी.व्ही मोबाईल समोर घालवण्यापेक्षा सृजनशीलतेस देण्याचे स्वयंव्यवस्थापन सुरु झाले.

**iii) <u>उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरिक्षणे व त्यांच्या नोंदी</u> :-** (निरिक्षण सुचीतील सांखीक माहितीनुसार)

१) शाळेशी पुन्हा नाळ जोडली गेली.

२) नेतृत्व गुण वाढीस लागले.

३) व्यावसायिक बाजारपेठ उपलब्ध करुन घेता येते याचा अनुभव मिळाला.

४) देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हातही घ्यावे ही उदात्त भावना वाढीस लागली.

५) बनवलेल्या कलाकृतींचे प्रत्यक्ष जीवनात उपयोजन झाले.

▪ **विद्यार्थ्यांमध्ये उपक्रमानंतर झालेल्या गुणात्मक बदलांचे निरिक्षण**

| **अ.क्र.** | **निरिक्षणाचा मुद्दा** | **उपक्रमोत्तर** |
|---|---|---|
| १) | Online तासाला नियमित हजर असतो. | ३०% |
| २) | सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळतो. | ८०% |
| ३) | स्वत:च्या जबाबदाऱ्या ओळखतो. | ७०% |
| ४) | अवतिभोवतीच्या गोष्टींचे बारकाईने निरिक्षण करतो. | ७५% |
| ५) | इतरांची टिंगल उडवतो. | ४०% |
| ६) | गटाने मिळुन कार्य करण्यास इच्छुक असतो. | ७०% |
| ७) | बराचसा रिकामा वेळ टी.व्ही  पाहण्यात घालवतो. | ३०% |
| ८) | कुटुंबाचा आर्थिक भार उचलण्यास मदत करतो. | ७०% |
| ९) | सृजनात्मक कार्यात भाग घेतो. | ८०% |
| १०) | दैनंदिन समस्येवर मात करण्याचा प्रयत्न करतो. | ८५% |
| ११) | नवनवीन गोष्टी शिकण्याची आस धरतो. | ७०% |
| १२) | नेतृत्व करण्यास तयार असतो. | ६०% |
| १३) | यशस्वी बनण्याबाबत उदासिन असतो. | ३०% |
| १४) | आपल्या कलेचे उपयोजन करतो. | ६०% |
| १५) | नियमित अभ्यास करतो. | ७०% |

**iv) <u>कार्यवाही करताना आलेल्या अडचणी</u> :-**

१) सुरवातीला विद्यार्थी उदासिन असत.

२) आर्थिक चणचण भासे.

३) स्वत:च्या कलाविष्काराचे मार्केटिंग करताना लाजत.

४) आत्मविश्वासाचा अभाव होता.


वरील अडचणी आल्या तरी विद्यार्थ्यांशी चर्चा केल्याने, त्यांची मदत घेतल्याने हा उपक्रम यशस्वी झाला.गावची बाजारपेठ मिळाल्याने आर्थिक विवंचना सुटण्यास हातभार लागला.

शाळेची गोडी निर्माण झाली. टी.व्ही  मोबाईल समोरचा वेळ कमी झाल्याने आरोग्यविषयक समस्या दूर झाल्या. वेळेचा सदुपयोग झाला.

**v) <u>माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वेचन</u> :-**

- **विद्यार्थ्यांमध्ये उपक्रमपूर्व व उपक्रमानंतर झालेल्या गुणात्मक बदलांचे तुलनात्मक निरिक्षण**

| अ.क्र. | निरिक्षणाचा मुद्दा | उपक्रमपूर्व | उपक्रमोत्तर |
|---|---|---|---|
| १) | Online तासाला नियमित हजर असतो. | १०% | ३०% |
| २) | सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळतो. | ८०% | ८०% |
| ३) | स्वत:च्या जबाबदाऱ्या ओळखतो. | ३०% | ७०% |
| ४) | अवतिभोवतीच्या गोष्टींचे बारकाईने निरिक्षण करतो. | ३५% | ७५% |
| ५) | इतरांची टिंगल उडवतो. | ८०% | ४०% |
| ६) | गटाने मिळुन कार्य करण्यास इच्छुक असतो. | ४०% | ७०% |
| ७) | बराचसा रिकामा वेळ टी.व्ही  पाहण्यात घालवतो. | ९०% | ३०% |
| ८) | कुटुंबाचा आर्थिक भार उचलण्यास मदत करतो. | ५०% | ७०% |
| ९) | सृजनात्मक कार्यात भाग घेतो. | ५०% | ८०% |
| १०) | दैनंदिन समस्येवर मात करण्याचा प्रयत्न करतो. | ४०% | ८५% |
| ११) | नवनवीन गोष्टी शिकण्याची आस धरतो. | २०% | ७०% |
| १२) | नेतृत्व करण्यास तयार असतो. | २०% | ६०% |
| १३) | यशस्वी बनण्याबाबत उदासिन असतो. | ६०% | ३०% |
| १४) | आपल्या कलेचे उपयोजन करतो. | ३०% | ६०% |
| १५) | नियमित अभ्यास करतो. | २०% | ७०% |


विद्यार्थ्यांमध्ये उपक्रमपूर्व व उपक्रमानंतर झालेल्या गुणात्मक बदलांचा तुलनात्मक आलेख
Online तासाला नियमित हजर असतो.
सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळतो.
स्वत:च्या जबाबदाऱ्या ओळखतो.
इतरांची टिंगल उडवतो.
गटाने मिळुन कार्य करण्यास इच्छुक...
बराचसा रिकामा वेळ T.V. पाहण्यात...
कुटुंबाचा आर्थिक भार उचलण्यास मदत...
सृजनात्मक काऱ्यात भाग घेतो.
दैनंदिन समस्येवर मात करण्याचा...
नवनवीन गोष्टी शिकण्याची आस धरतो.
नेतृत्व करण्यास तयार असतो.
यशस्वी बनण्याबाबत उदासिन असतो.
आपल्या कलेचे उपयोजन करतो.
नियमित अभ्यास करतो.
0%
20%
40%
60%
80%
100%
उपक्रमपूर्व
उपक्रमोत्तर

वरील सांख्यिकी माहितीवरून व आलेखावरून असे दिसून येते कि , विद्यार्थ्यांना सृजनशील बनविण्यासाठी ,दैनंदिन समस्येला तोंड देण्यास सक्षम बनविण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये एकात्मक बदल झालेला दिसून येतो. विविध प्रयोगांतून व उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये विद्यार्थी सृजनशील झाल्याचे दिसून आले.

त्याचबरो बर **who ने सुचवलेली स्वजागृती,समानुगती ,समस्या निराकरण ,निर्णय प्रक्रिया, चिकित्सक विचार प्रक्रिया ,सृजनशीलता ,ताणतणावांचे समायोजन हि जीवनकौशल्ये** रुजल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांमध्ये गुणात्मक बदल झाले त्यांच्या आलेख व सांख्यिकी माहिती १ व २ वरून बदल झाल्याचे दिसून येते .

१) उपक्रमापूर्वी नेहमी १०% विद्यार्थी हजर असत तर उपक्रमानंतर ३०% विद्यार्थी online तासाला उपस्थित राहू लागले .

२) सोशल डिस्टंसिन्गचे पालन होत असे.

३) उपक्रमापुर्वी केवळ ३०% विद्यार्थी स्वतःच्या जबाबदारी ओळखत असत. परंतू उपक्रमोत्तर ७०% विद्यार्थी स्वतःच्या जबाबदारी ओळखू लागले.

४) उपक्रमापूर्वी केवळ ३५% विद्यार्थी अवतीभोवतीच्या गोष्टींचे बारकाईने निरीक्षण करत तर उपक्रमानंतर ७५% विद्यार्थी अवतीभोवतीच्या गोष्टींचे बारकाईने निरीक्षण करू लागले .

५) ८०% लोक हे इतर लोकांची टिंगल उडवायचे उपक्रमानंतर हे प्रमाण ४०% वर आले .

६) उपक्रमाआधी ४०% गटाने कार्य करण्यास इच्छुक असत हेच प्रमाण वाढून ७०% विद्यार्थी गटाने कार्य करण्यास इच्छुक असत.

७) उपक्रमापूर्वी ९०% बराचसा वेळ टी.व्ही बघण्यात घालवत उपक्रमानंतर हे प्रमाण कमी होऊन ३०% वर आले.

८) केवळ ५०% विद्यर्थी कुटुंबास मदत करू शकत होते. पण हे प्रमाण वाढून उपक्रमानंतर ७०% झाले.

९) उपक्रमापूर्वी केवळ ५०% विद्यार्थी सृजनात्मक कार्य करण्याचा प्रयत्न करत. पण उपक्रमानंतर हे प्रमाण वाढून ८०% झाले.

१०) केवळ ४०% विद्यार्थी देनंदिन समस्येवर मात करण्याचा प्रयत्न करत.परंतु उपक्रमानंतर त्यात वाढ होऊन ८५% विद्यार्थी देनंदिन समस्येवर मात करण्याचा प्रयत्न करू लागले.

११) केवळ २०% विध्यार्थी नवीन गोष्टी शिकण्याचा प्रयत्न करत तर उपक्रमानंतर ते प्रमाण वाढून ७०% झाले.

१२) केवळ २०% विध्यार्थी नेतृत्व करण्यास तयार असत.उपक्रमानंतर ६०% विध्यार्थी नेतृत्व करण्यास तयार झाले.

१३) ६०% विध्यार्थी यश मिळवण्याबाबत उदासीन होते तर .उपक्रमानंतर हे प्रमाण कमी होऊन ३०% वर आले.

१४) उपक्रमापूर्वी केवळ ३०% विद्यार्थी आपल्या कलेचे उपयोजन करीत तर .उपक्रमानंतर ६०% विद्यार्थी आपल्या कलेचे उपयोजन करू लागले.

१५) नियमित अभ्यास करनाऱ्यांचे प्रमाण २०% वरून ७०% झाले.

## नवोपक्रमाची यशस्विता/फ़लनिष्पत्ती

**उद्दिष्ट क्र.१- अध्ययनक्षमतेनुसार स्वविकास व कलास्वाद या विषयातील अध्ययन क्षय शोधणे.**

१.१ विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलतेचा अभाव दिसून आला.

१.२ विद्यार्थ्यांना समाजाप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांचा विसर पडलेला आहे.

१.३ विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व क्षमतेचा अभाव दिसून येतो.

१.४ विद्यार्थ्यांमध्ये कलाविष्कार क्षमतेचा अभाव दिसून येतो.

**उद्दिष्ट क्र.२- सामाजिक समस्यांच्या अनुशंगाने समाजाप्रती असलेल्या स्वत:च्या जबाबदाऱ्या ओळखण्यास प्रोत्साहित करणे हे उद्दिष्ट सफ़ल झाले.**

२.१- विद्यार्थी त्यांच्या अवतीभोवतीच्या समस्या समजावून घेऊ लागले.

२.२- त्यांची समाजाप्रती असलेली जबाबदारीची जाणीव त्यांना होऊ लागली.

२.३- परस्परावलंबनाची जाणीव होऊन इतर विद्यार्थ्यांबाबत सहवेदना प्रतिपादित करु लागले.

**उद्दिष्ट क्र.३- स्वत:च्या उणिवांवर मात करत संघर्षजन्य परिस्थितिचे वस्तुनिष्ठपणे विश्लेषण करुन आपली आवड, क्षमता, संधी ओळखून ते कलाकृतीत उतरवण्यास सृजनशीलतेच्या आधारे नवनिर्मिती करण्यास प्रोत्साहित करणे हे उद्दिष्ट सफ़ल झाले.**

३.१- एखाद्या प्रयोगजीवी कलेत नवनिर्मीती करता येण्याची क्षमता आपल्यात आहे याची जाणीव होऊ लागली.

३.२- कलेचे विविध प्रकार विद्यार्थी समजावून घेऊ लागले.

३.३- सौदर्यदृष्टी विकसित होऊ लागली.

**उद्दिष्ट क्र.४ - नेतृत्वक्षमता विकसित करुन एकजुटीने सांघिक कार्य करण्यास प्रोत्साहित करणे.**

४.१- अवतीभोवती एखादा छोटासा बदल घडवण्यासाठी मी नेतृत्व करू शकतो ही भावना वाढीस लागली.

४.२- समान आवडीच्या क्षेत्रांबद्दल अधिक माहिती मिळवण्यासाठी गटाने कार्य करु लागले.

४.३- गटातील इतर विद्यार्थ्यांकडील विविधता स्विकारण्याची व तिचे महत्व समजून घेण्याची क्षमता वाढू लागली.

**उद्दिष्ट क्र. ५ - सशस्वी बनण्यासाठी योग्य नियोजन करण्यास प्रोत्साहीत करणे हे उद्दिष्ट सफ़ल झाले.**

५.१- विद्यार्थी स्वत:ची बलस्थाने ओळखू लागले.

५.२- स्वत:च्या उणिवांवर मात करुन मी ही काही करु शकतो असा विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊ लागला.

५.३- विद्यार्थ्यांमध्ये झालेले बदल व त्या अनुषंगाने मिळणाऱ्या संधी याबाबत सुसंगत चित्र विकसित होऊ लागले.

**उद्दिष्ट क्र.६- विद्यार्थी आत्मनिर्भर बनण्यास मदत करणे हे उद्दिष्ट सफ़ल झाले.**

६.१- त्यांच्या जवळील कलेच्या सादरीकरणाची क्षमता निर्माण झाली.

६.२- आपल्या कलेच्या सादरीकरण व विक्रीच्या माध्यमातून ते आर्थिक कमाई करु लागले. 'कमवा व शिका' हे कर्मवीरांचे ब्रीद सत्यात उतरण्यास मदत झाली.

६.३- स्वकमाईतुन मी माझे शिक्षण पूर्ण करु शकतो असा आत्मविश्वास निर्माण झाला.

## समारोप

टाकळी बोलवाड हायस्कूल टाकळी येथील विद्यार्थ्यांसाठी, त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने **"कोरोना आपत्ती ठरली इष्टापत्ती कमवा व शिका हीच विद्यार्थ्यांची संपत्ती"** हा उपक्रम इ.९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी राबविला.

या उपक्रमाची उद्दिष्टे निश्चितच साध्य झाली व उपक्रम यशस्वी पार पडला. यातून आपण कोणत्याही समस्येवर मात करु शकतो हा आत्मविश्वास निर्माण झाला. महत्त्वाचे म्हणजे फ़ार मोठे मानसिक समाधान मिळाले.

विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम इतर शाळांमध्ये ही राबविला जाऊ शकतो.

कर्मवीरांचे **'कमवा व शिका'** धोरण प्रत्यक्षात अंमलात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना माणूस म्हणून घडविता आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनुकीमध्येही वाढ झाली. म्हणूनच हा उपक्रम आदर्शवत आहे.

## सारांश

शालेय शिक्षणाबरोबरच विविध कला आत्मसात करण हे विद्यार्थी विकसनाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. यामुळेच सदरचा नवोपक्रम आवश्यक ठरतो.

या उपक्रमानंतर विद्यार्थ्यांचे मानसिक दडपण कमी झाले. आत्मविश्वास वाढला. सहकार्य वाढले. नेतृत्वगुण विकसित झाले. व्यवसाय कसा वाढवावा याची अनुभुती आली,शालेय गुणवत्ता वाढली.

सदर उपक्रम फ़ारच प्रभावी आणि सध्याच्या काळात गरजेचा असल्याचा अभिप्राय शिक्षक,पालक, ग्रामस्थ, पदाधिकारी यांच्याकडून मिळाला.विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाला चालना देण्यासाठी हा उपक्रम महत्वाचा वाटतो.

# संदर्भासूची

१) करंदीकर सुरेश (२००६), अध्यापणाचे मानसशास्त्र

फ़डके प्रकाशन, कोल्हापूर.

२) बोरचाटे शिवाजी (२००५),कृतीसंशोधन व नवोपक्रम

सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे.

३) जगताप ह.ना. शैक्षणिक मुल्यमापन

फ़डके प्रकाशन, कोल्हापूर.

४) कदम चा.प.,'शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र ',

नूतन प्रकाशन, पुणे.

५) बापट भा.गो. (१९८४), शैक्षणिक कृती संशोधन ,

नूतन प्रकाशन, पुणे.

६) कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका , इयत्ता आठवी (१९९६),

महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व

अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे.

७) दांडेकर रेणू (२००५), 'शिक्षणातील चांगले काही '

प्रफुल्लता प्रकाशन, पुणे.

८) https:youtube/XeS2YP2gCml - कोवीड कालावधीत शिक्षकाची भूमिका

# परिशिष्टे

**I ) YouTube Links :-**

i) https://youtu.be/gCQXWHiM5lo

ii) https://youtu.be/EWnkzLUnV4w

iii) https://youtu.be/tGE77URe7Ns

iv) https://youtu.be/6RxRLu1taR4

v) https://youtu.be/p0PvZYw8YSQ

vi) https://youtu.be/18X2o5vvUV4

## II) <u>पालक प्रश्नावली</u> :-

पालकांचे नाव :

पत्ता : मोबाईल नं. :

पाल्याचे नाव : इयत्ता :

प्र. १ - तुमचा पाल्य नियमित online class ला उपस्थित राहतो का ?

A) होय B) नाही

प्र. २ - अवतीभोवतीच्या समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करतो का ?

A) होय B) नाही

प्र. ३ - तुमचा पाल्य स्वतःच्या जबाबदाऱ्या ओळखतो का ?

A) होय B) नाही

प्र. ४ - नवनवीन गोष्टी शिकायला तुमच्या पाल्याला आवडतात का ?

A) होय B) नाही

प्र. ५ - नियमित वाचन- लेखन करतो का ?

A) होय B) नाही

प्र. ६ - तुमचा पाल्य गरजुंना मदत करतो का ?

A) होय B) नाही

प्र. ७ - कोणती कलाकृती / कलात्मक वस्तु बनवली आहे का ?

A) होय B) नाही

प्र. ८ - स्वतःची कला इतरांना शिकवण्यास इच्छुक असतो का ?

A) होय B) नाही

प्र. ९ - कुटुंबाचा आर्थिक भार उचलण्याचा प्रयत्न करतो का ?

A) होय B) नाही

प्र. १० - रिकाम्या वेळेचा उपयोग कशा प्रकारे करतो ?

### III) उपक्रमपूर्व / उपक्रमोत्तर निरिक्षण सुची :-

विद्यार्थ्यांचे नाव :

इयत्ता :


| अ.क्र | निरिक्षणाचा मुद्दा | होय | नाही |
|---|---|---|---|
| १) | Online तासाला हजर असतो. | | |
| २) | सोशल डिस्टिन्संगचे नियम पाळतो. | | |
| ३) | स्वच्छतेचे नियम पाळतो. | | |
| ४) | स्वतःच्या जबाबदाऱ्या ओळखतो . | | |
| ५) | सामाजिक संपत्तीचे रक्षण करतो. | | |
| ६) | इतर विद्यार्थ्यांची टिंगल उडवतो . | | |
| ७) | मुले मुली गटाने कार्य करण्यास सहभागी होतो. | | |
| ८) | बराचसा रीकामा वेळ टी.व्ही पाहतो. | | |
| ९) | कुटुंबाचा आर्थिक हातभार उचलण्यास मदत करतो. | | |
| १०) | सृजनात्मक कार्‍यात भाग घेतो | | |
| ११) | समस्येवर मात करतो. | | |
| १२) | नवनविन गोष्टी शिकण्यास आस धरतो. | | |
| १३) | आपल्या कलेचे उपयोजन करतो. | | |
| १४) | नेतृत्व करण्यास तयार असतो. | | |
| १५) | यशस्वी बनण्यासाठी नियोजन करतो. | | |

वरील दैनंदिन निरिक्षण सूची वरुन डिसेंबर २०२० ते जानेवारी २०२१ या महिन्यात विद्यार्थ्यांचे उपक्रम, पुर्व दैनंदिन नोंदी ठेवण्यात आल्या व प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यात आले

**IV) नवोपक्रमात सहभागी विदयार्थी :-**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे |
|---|---|
| १ | कु.सुस्मिता सतिश वाघमारे |
| २ | कु.रुचिका अमोल कांबळे |
| ३ | कु.इशिता विजय खाडे |
| ४ | कु.प्राची सचिन कांबळे |
| ५ | कु.सुप्रिया शंकर वाघमोडे |
| ६ | कु.श्रेया राजगोंडा पाटील |
| ७ | कु.नेहा संजय चौगुले |
| ८ | कु.योगिता अजित पाटील |
| ९ | कु.श्रावणी गुणधर पाटील |
| १० | कु.साक्षी अजित पाटील |
| ११ | कु. श्रावणी भाऊसो पाटील |
| १२ | कु. सायली महावीर पाटील |
| १३ | कु. अलमास अशपाक शेख |
| १४ | कु. सानिया राजू बोजगार |
| १५ | कु.सुहाना रफिक शेख |
| १६ | कु.पूजा रावसाहेब बिराजदार |
| १७ | कु.प्रेम बटू ऐवळे |
| १८ | कु.विकास जगन्नाथ कोरे |
| १९ | कु.पृथ्वीराज सुरेश पुजारी |
| २० | कु.सुशांत लक्ष्मण कल्लोळे |
| २१ | कु.संकेत सुनील पाटील |
| २२ | कु.जिनेशवर संजय पाटील |
| २३ | कु.स्वप्निल सुकुमार पाटील |
| २४ | कु.अथर्व शशिकांत मिरजे |
| २५ | कु.श्रेया संजय पाटील |

**V) <u>पालक अभिप्राय</u> :-**



दिनांक - 12-7-2021


पालक अभिप्राय

माझी मुलगी कु.- श्रावणी गुणधर पाटील. टाकळी इयत्ता - वी.

कोरोना काळात विद्यार्थ्यांची आणि शाळेची नाळ तुटली होती. जेव्हा ऑफलाइन शाळा सुरु झाली. तेव्हा शाळेमध्ये सौ. नम्रता पाटील मॅडमांनी वेगवेगळे उपक्रम घेतले. त्या उपक्रमात माझी मुलगीही सहभागी होती. तिने उपक्रमामध्ये मास्क-शिवणे, लोकरीची तोरणे, इ. बनवून विक्रीस ठेवले. यामुळे तिला वस्तूंची विक्री कशाप्रकारे करायची असते हे देखील चांगलेच समजले. वस्तू विकून मिळालेल्या पैशांनी आमच्या घरातील आर्थिक समस्या सुटल्या. कोरोना काळात पैशांची जी कमतरता होती. ती तिने भरून काढली. घरामध्ये पैशांची अडचणे होती, ती तिच्या विकलेल्या वस्तूंच्यामुळे भरून आल्या. मॅडमांनी राबवलेल्या या उपक्रमाच्या विद्यार्थ्यांना तर फायदा झालाच शिवाय घरामध्ये-देखील खूप मदत झाली. तिच्या शिक्षणाच्या खर्च आता ती स्वतःच भागवू शकते.

A.G. पाटील

नाव:- सौ. अर्चना गुणधर पाटील.



दि - 10/2/2021

अभिप्राय

मी सौ. सरोजा नंदकिशोर सुतार (सल्लागार समिती सभासद टाकळी बोलवाड, नायस्कूल)

कोरोना काळात विद्यार्थ्यांची आणि शाळेची नाळ तुटली होती जेव्हा ऑफलाईन शाळा सुरु झाली तेव्हा शाळेमध्ये सौ नम्रता पाटिल मॅडम यांनी वेगवेगळे उपक्रम घेतले तश्या त्या खुप हुशार आणि गुणी मॅडम आहेत आणि शाळेच्या बाकीच्या मॅडम सुद्धा आहेत त्यांच्या या उपक्रमामध्ये अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी सहभागी झाले त्यांनी उपक्रमामध्ये मास्क शिवणे, लोकरिचे तोरण मायक्रॉनच्या वस्तू इ. वस्तू मुलामुलींना बनवायला शिकले आणि त्यांच्यातील दडलेले गुण पण सर्वांन समोर आणले या सर्व वस्तूचे शाळेमध्ये प्रदर्शन भरवले व त्या वस्तू विक्रिस ठेवल्या. त्यातील मास्क आणि मायक्रॉनच्या वस्तू मला खुप आवडल्या आणि मी त्या वस्तू खरेदी पण केल्या. यामुळे मुलांना वस्तूची विक्री कशी करायची हे समजले त्यामध्ये मुलींनी खाद्यपदार्थ पण विक्रिस ठेवले होते ते पण खुप चविष्ट होते. वस्तू विकुन मिळालेल्या पैशातुन घरातील आर्थिक समस्या सुटल्या. मॅडमांनी राबावलेल्या या उपक्रमाच्या विद्यार्थ्यांना तर फायदा झालाच शिवाय विद्यार्थ्यांच्या घरामध्ये देखील खुप मदत झाली.

कळावे,

आपली विश्वास,

नाव सौ सरोज नंदकुमार सुतार